# राष्ट्रवाद आणि आजच्या भारतापुढील समस्या

❑ नी. र. वऱ्हाडपांडे ❑

आजचे जग व्यापार व संस्कृती या दोन्ही दृष्टींनी एकरूप होण्याच्या मार्गावर असताना राष्ट्रवादासारख्या विभक्तता जोपासणाऱ्या भावप्रणालीची काही जरूर नाही, उलट ही भावप्रणाली आमच्या समस्या सोडवण्याऐवजी मार्गातील एक मोठा अडसर होऊन राहील, असे राष्ट्रवाद्यांना आज सुनावण्यात येत आहे. तेव्हा आजच्या भारतात राष्ट्रवादाचे प्रयोजन आहे, याची चर्चा करणे आवश्यक आहे.

रामजन्मभूमीच्या प्रश्नापासून आरंभ करू. नेहरू व नेहरूवादी काँग्रेसने हा प्रश्न धार्मिक आहे व धर्माचे राजकारणात काही प्रयोजन नाही, असे म्हणून रामजन्मभूमीच्या आंदोलनाविरूद्ध सतत प्रचार केला.

रामाचा जन्म जेथे बाबराने उद्ध्वस्त केलेले राम मंदिर होते तेथेच झाला. राम हा विष्णूचा अवतार होता, त्याची त्याच्या जन्मभूमीच्या ठिकाणीच पूजा केल्याने आम्हाला सद्‌गती मिळेल या श्रद्धेतून रामजन्मभूमीच्या चळवळीचा जन्म झाला असेल, तर ती धार्मिक चळवळ आहे असे म्हणता येईल. पण असेच केवळ असेल तर बाबराने रामाचे मंदिर उद्ध्वस्त केले याची चीड सश्रद्ध हिंदूपेक्षाही शतपटीने जास्त सावरकरांसारख्या नास्तिकाला का येत होती? मीही नास्तिकच आहे, अर्थात राम हा विष्णूचा अवतार होता असे मी मानत नाही. तसेच रामाचा जन्म रामजन्मभूमीवर झाला याबद्दल मी साशंक आहे, कारण रामजन्मभूमीचेच केवळ नव्हे, तर अयोध्येचेच रामकाळातील अस्तित्व काही पुरातत्ववेत्ते अमान्य करीत आहेत. राम-रावण युद्ध झाले याबद्दलदेखील मी साशंक आहे, कारण माझ्या मते राम ख्रि. पू. ३७०० च्या सुमारास झाला व या सुमारास आज दाखवण्यात येणाऱ्या किष्किंधेत (हंपीत) व श्रीलंकेत संस्कृतभाषी लोकांची वस्ती झाली होती हे सिद्ध करणे कठिण आहे. उपलब्ध रामायण ग्रंथात शक, हूण, यवन म्हणजे ग्रीक व बुद्ध यांचे उल्लेख आहेत व त्यातील उत्तरकांडासाखी कांडेच्या कांडे प्रक्षिप्त आहेत. तेव्हा रामाचे ऐतिहासिक अस्तित्व हेही मला बाबराने केलेल्या रामजन्मभूमीच्या विध्वंसाबद्दल चीड आणण्यास कारण नाही.

> **“ हिंदू-मुस्लीम व स्पृश्यास्पृश्य प्रश्नावर राष्ट्रवाद हाच तोडगा आहे; त्याचप्रमाणे आज गाजत असलेल्या भ्रष्टाचाराच्या समस्येवरही तोच तोडगा आहे. एखाद्या मॅचमध्ये भारत जिंकला, तर आपल्यालाच काही तरी मिळाले असे सर्वसाधारण भारतीयाला वाटते. देशाचे बरे व्हावे अशी ही नैसर्गिक इच्छा प्रबळ व्हायची असेल, तर राष्ट्रवादाच्या भावनेचे संवर्धन करावे लागेल. तसे ते झाले तर भ्रष्टाचार केल्यास देशाचे नुकसान होईल अशी खंत वाटेल व भ्रष्टाचाराला बराच आळा बसेल. ”**

### राष्ट्राच्या अस्मितेचा प्रश्न

मला बाबराची चीड येते, कारण राम झाला असो वा नसो, पण बाबराच्या काळी रामजन्मभूमीवर रामाचे देऊळ होते, तेथे लाखो हिंदू पूजा करीत व साऱ्या राष्ट्राचा तो मानबिंदू होता. ''तुमच्या मानबिंदूची मी अशी वाताहत करतो पहा, तुम्ही काय करता ते पाहू.'' असे साऱ्या राष्ट्राला आव्हान देऊन बाबराने ते देऊळ उद्ध्वस्त केले व त्यावर मशीद बांधली. तेथे पूर्वी देऊळ होते हे हिंदू विसरूनच गेले तर त्यांचा अपमान पुरा होणार नाही, म्हणून त्या देवळाच्या उद्ध्वस्त वास्तूत त्याने मशीद बांधली. सर्वत्र पाडलेल्या देवळांची व बांधलेल्या मशिदींची हीच कहाणी आहे. माझी रामावर देव म्हणून श्रद्धा असो वा नसो, माझ्या लक्षावधी देशबांधवांच्या भावना रामावर केंद्रित आहेत, त्या भावना बुद्धीपुरस्सर दुखवू पाहणारा पुरुष मला अत्यंत द्वेष्य वाटतो. अर्थात रामजन्मभूमीचा प्रश्न हा धार्मिक प्रश्न नसून राष्ट्राच्या अस्मितेचा प्रश्न आहे.


''हा राष्ट्रीय अपमान होऊन चारशे वर्षांचा काळ लोटला, आता त्याची आठवण जागृत करण्यात काय फायदा आहे?'' अस्पृश्यांना सवर्णांनी दाससदृश स्थितीत लोटले त्याला चारशेच नव्हे, तर चार हजार वर्षे झाली असतील, मग आता तो इतिहास का कुटला जातो ?

कारण स्पष्ट आहे. घटना प्राचीन असली की, तिचे परिणामही प्राचीन असतात असे नव्हे ! अस्पृश्यता हजारो वर्षांपूर्वी निर्माण झाली असली तरी तिचे परिणाम आजतागायत धुमाकूळ घालताहेत. ते परिणाम जोपर्यंत धुमाकूळ घालताहेत, तोपर्यंत अस्पृश्यतेचा विचार व ती घालविण्याचे उपाय यांचे महत्त्व राष्ट्राच्या जीवनात राहणारच. सवर्ण व अनुसूचित जाती यांच्यात सौहार्द नांदल्याशिवाय देशाची प्रगती कठिण होईल. किंबहुना कोट्यवधी लोकांना दलित ठेवून झालेली प्रगती ही

खरोखर प्रगती आहे, असे म्हणता येणार नाही. म्हणून अस्पृश्यतेचा नायनाट झाला पाहिजे.

**समान राष्ट्रीयत्वाचे पोषण**

असा नायनाट करुन सर्व नागरिकांमध्ये सौहार्द निर्माण करण्याचा एकच उपाय आहे व तो म्हणजे समान राष्ट्रीयत्वाचे पोषण. दलितांना वाईट वागविण्यात आले, पण पूर्वी असे केल्याबद्दल सर्वांना पश्चात्ताप होत आहे. दलितांवर अन्याय झाला तरी या देशाच्या हजारो वर्षांच्या इतिहासामध्ये सवर्णांबरोबर एकाच देशात जीवन कंठल्यामुळे त्यांच्यात व सवर्णांत जे सांस्कृतिक साम्य निर्माण झाले आहे, त्यावर भर देऊन ''आपल्याला या देशाच्या बाहेरचा दुसरा कोणी हात देणारा नसून, या देशाचे नागरिकच शेवटी आपले भाऊ आहेत हे आपण ओळखले पहिजे,'' अशी भावना दलितांत निर्माण करणे हाच सवर्ण-दलित यांच्यात सौहार्द निर्माण करण्याचा मार्ग आहे. समान इतिहासाबद्दल अभिमान, समान आपत्तीबद्दल खेद, समान यशाबद्दल अभिमान यालाच राष्ट्रीयत्व म्हणतात. अस्पृश्यतेच्या समस्येवर राष्ट्रवाद हाच उपाय आहे.



राममंदिराची उभारणी : राष्ट्रीय अस्मितेचा प्रश्न

**भारतीय मुसलमान हे हिंदूराष्ट्राचेच घटक**

त्याचप्रमाणे हिंदू-मुस्लीम प्रश्नावरदेखील राष्ट्रवाद हाच उपाय आहे. सवर्णांना ज्याप्रमाणे, त्यांनी दलितांना दिलेल्या वागणुकीबद्दल लाज वाटली पाहिजे, त्याप्रमाणे मुसलमानांना इस्लामच्या पुष्कळशा इतिहासाबद्दल लाज वाटली पाहिजे. सवर्णांना अस्पृश्यादी रुढीबद्दल लाज वाटावी म्हणून या रुढींचा इतिहास सांगणे जसे आवश्यक आहे, तसेच भारतीय मुसलमानांना इस्लामी इतिहासाच्या लाजिरवाण्या भागाबद्दल लाज वाटावी म्हणून हा इतिहास सांगणे आवश्यक आहे. ''काफिरांची देवळे पाडा व त्यांच्यावर मशिदी बांधा'', अशी कुराणाची शिकवणूक आहे की, नाही या वादात येथे शिरण्याचे प्रयोजन नाही. भारतावर आक्रमण करणाऱ्या तुर्क, अफगाण व मुघलांचे वर्तन याच तत्त्वानुसार झाले होते, हे नाकबूल करणारे लोक जाणूनबुजून खोटा इतिहास सांगण्याची प्रतिज्ञा करून बसले आहेत. ही वागणूक लाजिरवाणी आहे. म्हणून '' खऱ्या इस्लामची तशी शिकवणूक नाही'' असे सोंग आणण्याचे कारण नाही. तशी शिकवणूक असेल तर, ''इस्लामचा हा भाग आम्हाला मान्य नाही'', असे भारतीय मुसलमानांनी म्हणावे अशी या राष्ट्राची अपेक्षा आहे हे स्पष्ट केले पाहिजे.

**संसद सार्वभौम, शरियत नव्हे !**

मी हिंदू राष्ट्राचे समर्थन करीत असता एका श्रोत्याने मला विचारले, ''तुमच्या हिंदू राष्ट्रात मुसलमानांना आपला धर्म पाळण्याची मुभा असेल की नाही ?'' त्यावर मी उत्तर दिले, ''मुसलमानांनाच काय माझ्या हिंदू राष्ट्रात हिंदूंनादेखील आपला धर्म पाळण्याची मुभा असणार नाही.'' हे तत्त्व आपल्या संविधानाने मान्य केलेच आहे. अस्पृश्यता, सती वगैरेंवर बंदी घालताना या रुढी धर्मशास्त्राला मान्य आहेत की नाहीत याची संविधानाने पर्वा केली नाही. याचाच अर्थ असा की, श्रुतिस्मृतिपुराणोक्त हिंदू धर्म पाळण्याचे हिंदूंना स्वातंत्र्य आहे असे आमचे संविधान मान्य करीत नाही. हिंदूंनी आपल्या धर्माचा कोणता भाग पाळावा व कोणता पाळू नये हे ठरविण्याचा संसदेला अधिकार आहे. हिंदूंच्या बाबतीतली संविधानाची ही भूमिका मुसलमानांनाही लागू आहे, असे स्पष्ट करणे आवश्यक आहे. शरियत पाळणे हा मुसलमानांचा धर्मसिद्ध अधिकार आमच्या संविधानाला मान्य नाही. येथे आमची संसद सार्वभौम आहे, शरियत नव्हे.

**असत्याच्या पूजेने प्रगती साधेल काय ?**

अर्थात मुसलमानांनी तुर्क, अफगाण, मुघल आक्रमकांशी आपले काही नाते नाही या भूमिकेवरून वागले पाहिजे. असे वागणे त्यांना मुळीच जड जाऊ नये, कारण ते तुर्क, अफगाण, मुघलादिकांचे भाईबंद नाहीत. ''हिंदू राजा दाहिर हा आमचा पूर्वज आहे, त्याला हरविणारा कासम नव्हे !'' असे खुद्द पाकिस्तानमधले सिंधी म्हणू लागले आहेत. बांग्लादेशच्या चळवळीने जोर पकडला, तेव्हा मुघल हे परकीय आक्रमक होते, असे बांग्लादेशचे स्वातंत्र्यसैनिक म्हणत होते. पाकिस्तानमध्ये सध्या भारताच्या ज्या भागाला पाकिस्तान म्हणतात त्या भागाच्या इस्लामपूर्व इतिहासाबद्दल अभिमान बाळगण्याची प्रवृत्ती वाढत आहे. 'फाइव्ह थाउझण्ड इअर्स ऑफ पाकिस्तान' या शीर्षकाचे ग्रंथ लिहिले जात आहेत. वेदांची रचना पाकिस्तानमध्ये झाली, भारतात नव्हे; असे अभिमानाने सांगितले जात आहे. पाणिनी हा पाकिस्तानचा महान वैयाकरणी होता म्हणून पाणिनीबद्दल अभिमान बाळगण्यात येत आहे. उर्दू ही आमची भाषा नसून संस्कृतप्रचुर बंगाली ही टागोर व शरच्चंद्र यांची भाषा हीच आमची भाषा आहे, असे बांग्लादेशात सांगितले जात आहे.

अर्थात भारतीय मुसलमानांना तुमचे राष्ट्रीयत्व व हिंदूंचे राष्ट्रीयत्व एकच आहे असे शिक्षण देणे मुळीच कठिण नाही. भारतीय

मुसलमानांना आपल्या इस्लामपूर्व इतिहासाची जाणीव करून देणे, हाच हिंदू-मुस्लीम प्रश्न सोडवण्याचा एक मार्ग आहे.

तात्पर्य राष्ट्रवाद हाच स्पृश्यास्पृश्य समस्येप्रमाणेच हिंदू-मुस्लीम समस्येवरही तोडगा आहे.

आज लाखो लोक काशी-विश्वेश्वर, मथुरेतील कृष्णजन्मभूमी व रामजन्मभूमीच्या यात्रेला जातात. त्या सगळ्यांना हे औरंगजेबाने पाडले, हे बाबराने पाडले असे सांगण्यात येते. या सर्व लोकांच्या मनात मुसलमानांबद्दल सद्बुद्धी निर्माण होणे कधी तरी शक्य आहे काय ? कलहाची बीजे कायम ठेवून नव्हे, त्यांना डोक्यावर घेऊन कलह मिटणार आहे काय ?

या प्रश्नावर आमच्या सेक्युलरवाद्यांनी एक सोपा उपाय शोधून काढला आहे. तो म्हणजे, ''भारतभर इस्लामी राजकर्त्यांनी देवळे पाडली व त्या जागी मशिदी बांधल्या हे कुणाला सांगूच नये. चारदोन संघवाल्या जातीयवाद्यांनी इस्लामी राज्यकर्त्यांवर हे मिथ्या आरोप केले आहेत, वस्तुतः ते सर्वधर्मसमत्व जपणारे न्यायी राज्यकर्ते होते,'' असा प्रचार करावा.

जगभरात प्रसिद्ध असलेला इतिहास केवळ चारदोन सेक्युलरवाद्यांच्या प्रचाराने खोटा ठरविता येईल, असे या उपायात गृहीत धरण्यात आले आहे. खोटेपणावर अशी भिस्त कम्युनिस्ट सरकारांनी ठेवली होती. पण त्यांना लवकरच अनुभवास आले की, खऱ्याला खोटे ठरविण्याला जबरदस्त मर्यादा आहेत. भांडवलशाही देशात मजूर उपाशी मरत आहेत व कम्युनिस्ट देशातले मजूर त्या मानाने सुखी आहेत, यावर कम्युनिस्ट नागरिकांचा कधीच विश्वास बसला नाही. खोटेपणाचा आश्रय घेऊन उभे केलेले स्टॅलिनच्या मोठेपणाचे चित्र त्याच्या मृत्यूबरोबर चिटोरे बनले. खुद्द रशियात लालबावटा फेकून पूर्वीचा भांडवलशाही ध्वज स्वीकारण्यात आला. भारतात येणारे कोणतेही सरकार स्टॅलिनच्या शतांशही प्रबल असण्याचा संभव नाही.

**''आपल्या भाषा नालायक आहेत. त्या विज्ञानाचे माध्यम होऊच शकत नाहीत. इंग्रजी राज्य हा आमच्या संस्कृतीचा चवथा अध्याय आहे. त्यापूर्वी तीन अध्याय म्हणजे आक्रमक द्रविड, आक्रमक आर्य व आक्रमक तुर्क, अफगाण व मुघल. तात्पर्य आपले राष्ट्रच सुरूवातीला आक्रमक म्हणून आलेल्या व नंतर दुसऱ्या आक्रमकांनी पराजित केलेल्या लोकांचे बनले आहे. तेव्हा आपले असे काहीच नाही'', असा राष्ट्रीय अस्मिता पूर्णपणे नष्ट करणारा प्रचार नेहरूंनी सतत केला.**

तेव्हा सेक्युलर थापेबाजी किती टिकाव धरू शकेल याचा सेक्युलरवाद्यांनी विचार करावा.

खोटा इतिहास सांगण्याचा भारतात काय परिणाम झाला हे आपण पाहतोच आहोत.

**भ्रष्टाचाराच्या समस्येवर राष्ट्रवाद हाच तोडगा**

बाबराने रामजन्मभूमी उद्ध्वस्त केलीच नाही, हा भाजपाचा खोटा प्रचार आहे, अशी बतावणी केल्यास मुसलमान भाजपावर रुष्ट होतील, असा आमच्या 'सेक्युलॅरिस्टांचा' कयास होता. पण त्यांना ही साधी गोष्ट माहीत नाही की, मुसलमान भाजपा-हिंदू व इतर हिंदू यांच्यात फारसा फरक करत नाहीत. बाबरी ढाचा पाडल्याबद्दल ते भाजपाला दोष देत नसून नरसिंहरावांनाच दोष देतात; यावरून हे स्पष्ट व्हावे. बाबराने रामजन्मभूमी उद्ध्वस्त केली नाही यावर सर्वसाधारणपणे कोणाचा हिंदूचा विश्वास बसत नाही. उलट मुसलमानांवर अशा प्रचाराचा परिणाम त्यांचा हिंदूंबद्दलचा द्वेष वाढवण्यात होतो. बाबराने हिंदूंचे देऊळ पाडले तेव्हा हिंदूंना त्याबद्दल चीड यावी हे मुसलमानांना अस्वाभाविक वाटत नाही. ''बाबराने खरोखर रामजन्मभूमी उद्ध्वस्त केली असे सिद्ध झाले तर मी स्वतः बाबरी ढाचा पाडून त्यावर मंदिर बांधण्यासाठी कारसेवा करायला तयार आहे,'' असे बाबरी समितीचे सदस्य शहाबुद्दीन म्हणाले होते. पण बाबराने राम मंदिर पाडले यावरच आमच्या सरकारने शंका प्रदर्शित करून त्याबद्दल प्रमाण मागण्यास सुरूवात केली, तेव्हा हिंदूंवर अन्याय झाला आहे असे ज्या मुसलमानांना वाटत होते त्यांनादेखील हिंदू खोटी कारणे दाखवून आमच्या मशिदी पाडू इच्छितात असे वाटले आणि त्यांच्या मनात मुळात कदाचित नसलेला हिंदूंबद्दलचा द्वेष नव्याने निर्माण झाला. बाबरी ढाचा पडल्यावर ''हाय हाय'' म्हणून नरसिंहरावांनी छाती बडविली नसती, तर त्यानंतर उफाळलेले दंगे उफाळले नसते.

हिंदू-मुस्लीम व स्पृश्यास्पृश्य प्रश्नावर राष्ट्रवाद हाच तोडगा आहे;

त्याचप्रमाणे आज गाजत असलेल्या भ्रष्टाचाराच्या समस्येवरही तोच तोडगा आहे. भ्रष्टाचार वाढण्याचे मुख्य कारण आज देशात स्वार्थापलीकडे पाहायला लावील अशी भावनाच उरलेली नाही. ज्याच्याजवळ जास्त पैसा तो जास्त सन्मान्य हे समीकरण झाले आहे. थोड्याफार प्रमाणात हे समीकरण सर्वदा व सर्वत्रच राहिले आहे, पण त्याला आवर घालणाऱ्या शक्तीही समाजात होत्या. एखाद्या मॅचमध्ये भारत जिंकला तर आपल्यालाच काही तरी मिळाले असे सर्वसाधारण भारतीयाला वाटते. देशाचे बरे व्हावे अशी ही नैसर्गिक इच्छा प्रबळ व्हायची असेल तर राष्ट्रवादाच्या भावनेचे संवर्धन करावे लागेल. तसे ते झाले तर भ्रष्टाचार केल्यास देशाचे नुकसान होईल अशी खंत वाटेल व भ्रष्टाचाराला बराच आळा बसेल. ''सरदार पटेल कधीच पंतप्रधान झाले नाहीत, पण बहुतेक पंतप्रधानांपेक्षा सरदार पटेलांच्या नावालाच देशाची मानवंदना मिळते. तुम्ही गृहमंत्री राहूनच काही करून दाखवाल तर पंतप्रधान झाल्याने तुमचे जे नाव होणार त्यापेक्षा मोठे नाव होऊ शकते'', असे अटलबिहारी वाजपेयींनी चरणसिंगांना सांगितले. याचा त्यांच्यावर परिणाम झाला नाही व वाटेल तशा कारवाया करून पंतप्रधानपदाचा टिळा लावल्याशिवाय आपण मोठे ठरणार नाही असेच त्यांच्या मनाने घेतले. देशभक्तीची भावना जाज्वल्य असती तर गृहमंत्री राहूनच त्यांनी देशाचे काही भरीव कार्य करण्याचा प्रयत्न केला असता.

भ्रष्टाचारापेक्षा राष्ट्रवादाचा ज्याच्याशी काही संबंध नाही असे सकृतदर्शनी वाटते ते विज्ञानाचे क्षेत्र घेऊ. पं. नेहरुंनी विज्ञानासाठी मोठे कार्य केले असे सांगण्यात येते. पण हे कार्य म्हणजे विज्ञानावर पैसा खर्च करणे. या खर्चाने काहीच निष्पन्न झाले नाही, असे त्यांच्याच कन्येने एका सायन्स काँग्रेसचे उद्घाटन करताना सांगितले. याच्या कारणांचा फारसा विचार झाला नाही. याचे महत्त्वाचे एक कारण विज्ञानाचा व इंग्रजी भाषेचा नेहरुंनी जोडलेला संबंध हे आहे. ''आपल्या भाषा नालायक आहेत. त्या विज्ञानाचे माध्यम होऊच शकत नाहीत. इंग्रजी राज्य हा आमच्या संस्कृतीचा चवथा अध्याय आहे, त्यापूर्वी तीन अध्याय म्हणजे आक्रमक द्रविड, आक्रमक आर्य व आक्रमक तुर्क, अफगाण, मुघल. तात्पर्य आपले राष्ट्रच सुरूवातीला आक्रमक म्हणून आलेल्या व नंतर दुसऱ्या आक्रमकांनी पराजित केलेल्या लोकांचे बनले आहे. तेव्हा आपले असे काहीच नाही'', असा राष्ट्रीय अस्मिता पूर्णपणे नष्ट करणारा प्रचार नेहरुंनी सतत केला. याप्रकारे अस्मिता नष्ट झालेल्या समाजात विज्ञानाचे रोपटे तग धरू शकेल काय ? विज्ञान हे स्वयंप्रज्ञांचे क्षेत्र आहे. ज्यांची अस्मिताच नष्ट झाली त्यांच्यात स्वयंप्रज्ञा कुठून येणार ?

नेहरुंच्या अस्मितानाशक शिकवणुकीचा परिणाम असा झाला की, विज्ञानावर कोट्यवधी रुपये खर्चूनही विज्ञानामध्ये भारताचा सत्तरावा म्हणजे जवळजवळ शेवटचा नंबर आहे !

**- नी. र. वऱ्हाडपांडे**
**३८, हिंदुस्थान कॉलनी,**
**अमरावती मार्ग, नागपूर - १०.**